भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.८००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/१२/२०१७

**१) संगनमत करून एटीएम कार्डचे पासवर्ड माहीत करून पैसे काढुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/१२/२०१७ चे १९.५५ वाजता ते ०३/१२/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान फिर्यादी सौ. आशा दिलीप बोरकर वय ४४ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी नहर रोड सेंदुरवाफा (मुख्याधापीका) ही तिचे मुला सोबत नवीन एटीएम कार्डचे पासवर्ड बदलवीत असतांना यातील ३ अनोळखी आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस मदत करण्याचे बहाण्याने अप्रमाणीक पणे फिर्यादी कडील एटीएम कार्ड बदली करून पासवर्ड माहीत करून घेतला, व बाहेर राज्यातील एटीएम मशीन मधुन फिर्यादीचे बॅक खात्यातील रक्कम काढुन तसेच दुसऱ्या बॅक खात्यावर हस्थानतरण करून फिर्यादीचे एकुन ३,६८,८८२/रु. ची फसवणुक केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४२०,३४ भादवी. सहकलम ६६(सी) आय.टी.ॲक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पोलीस स्टेशन साकेली हे करीत आहेत.

**२) धानाचे पोते जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/१२/२०१७ चे ०४.०० वाजता यातील आरोपीने फिर्यादीला तु शकुंतलाची शेती बटयीने का केली, तिचे शेतीचा धान तुला होवु देणार नाही, असे म्हणुन फिर्यादीचे तनसीवर चुरना करून ठेवलेले एकुन १५ पोते ७० किलो वजनाचे धान किमती २०,०००/रु. चे माचीस चे काळीने पेटवुन नुकसान केल्याने फिर्यादी प्रकाश भगवान धुर्वे वय २६ वर्ष रा. खुर्सीपार/पुरकाबोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व वरठी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ हातभट्टी दारू किंमती ५६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०८ तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेले आहे.

04.12.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.